महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त सातारा यांचे कार्यालय
OFFICE OF THE DISTRICT DEPUTY COMMISSIONER OF ANIMAL HUSBANDRY
हॉटेल लेक व्हियु जवळ, जे.के. टायर्ससमोर, गोडोली-रहिमतपुर रोड, सातारा.
Near Hotel Lake View, Infront of J.K.Tyres, Godoli-Rahimatpur Road, Satara.
E-Mail : ddcahsatara@gmail.com Telephone No.- 02162 221907

सातारा, दिनांक 22/07/2021

## प्रेस नोट

**विषय :** प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी (SPCA), सातारा ची सभा दिनांक 22/07/2021 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाल्याबाबत.

सातारा जिल्हयाची प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीची सभा दिनांक 22/07/2021 रोजी मा. जिल्हाधिकारी श्री शेखर सिंह यांचे अध्यक्षतेखाली सकाळी 11.00 वाजता संपन्न झाली.

जिल्हास्तरीय प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीची स्थापना सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम 1950 अन्वये दिनांक 10 ऑक्टोबर 2019 रोजी करण्यात आली असुन या सोसायटीमध्ये शासकीय पदसिध्द व अशासकीय सदस्यांचा समावेश आहे. सोसायटीचे पदसिध्द अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी श्री. शेखरसिंह यांचे अध्यक्षतेखाली सोसायटी सदस्यांची सभा दिनांक 22/07/2021 रोजी पार पडली. सोसायटीमार्फत प्राणी कल्याण विषयक कामकाज करण्यात येते.

सभेच्या सुरुवातीस डॉ. अंकुश परिहार जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सातारा यांनी सोसायटीचे कामकाजाबाबत माहिती व विविध प्राण्यांचे छळ होवू नये याकारिता करण्यात आलेले कायदयांची माहिती व सादरीकरण केले. यांमध्ये 1. प्राणी कलेष प्रतिबंधक कायदा 1960 2. महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा 1976 व 3. महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा)कायदा 1995 अंतर्गत संपुर्ण गोवंश हत्याबंदी बाबतची माहिती देण्यात आली.

सभेमध्ये विविध प्राणी कल्याणविषयी कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी श्री. शेखरसिहं यांनी सभेमध्ये जिल्हयामध्ये कोणत्याही ठिकाणी बैलगाडा शर्यतीचे आयोजनाबाबत सोसायटीने दक्ष राहणेच्या सुचना देवून, शासनाचे आदेशाने शर्यतींवर बंदी असतांना जर कोणी दोषी आढळल्यास संबंधितांविरुध्द तात्काळ गुन्हा नोंद करुन कडक कारवाईचे निर्देश दिलेत.

जिल्हयामध्ये नागरिकांच्या तक्रारीवरुन भटक्या कुत्रयांची वाढती संख्या नियंत्रित करणेबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबतही चर्चा करण्यात येवून शासनाचे निर्देशानुसार ग्रामीण व शहरी भागात स्थानिक स्वराज्य संस्थांची देखरेख समिती स्थापन करुन मनुष्य कुत्रा संघर्ष टाळणेसाठी कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्यात. पशुसंवर्धन विभागानेही प्राणी संतती नियम 2001 नुसार (Animal Birth Control Pogramme) भटक्या कुत्रयांची संख्या नियंत्रित होणेसाठी निर्बीजीकरण शिबीरांचे आयोजन करावे. जिल्हयामध्ये पाळीव प्राणी दुकान नियम २०१८ व श्वान प्रजनन व विपणन नियम,२०१७ ची अंमलबजावणी करण्यात यावी. या कायदयानुसार श्वान प्रजनन व पाळीव प्राणी विक्री करणारे दुकाने व आस्थापने यांनी त्वरीत महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पुणे यांचेकडे नोंदणी करावी अन्यथ: त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तरी नोंदणी ची अधिकच्या माहितीसाठी पशुसंवर्धन विभागास संपर्क साधण्याचे आवाहन मा. जिल्हाधिकारी यांनी केले.

सभेस जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. संतोष धोत्रे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. विनोद चव्हाण , जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी श्री. संजय शिंदे, सातारा मुख्यालयाचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविण पवार, जिल्हा माहिती अधिकारी व इतर सदस्य उपस्थित होते.

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, तथा सदस्य सचिव**
**प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी, (SPCA) सातारा**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी तथा सदस्य**
**प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटी, (SPCA) सातारा.**

2/- कृपया वरील प्रेस नोट यांस वृत्तपत्रातुन प्रसिध्दी देण्यात यावी.